# Government College of Engineering
**Station Road, Osmanpura, Chha.Sambhajinagar– 431 005**

In Pursuit of Global Competitiveness

Phone : (0240) 2366101, 2366102,103, 110, 111 Fax : (0240) 2332835
E-Mail – principalgeca@yahoo.com Web – http://www.geca.ac.in


जा.क्र. शाअमछसं /मेस/निविदा/बातमी/२०२६/2640 दिनांक – 20/08/२०२६

20 AUG 2026

## — निविदा सुचना —

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त),छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील मुलींचे वसतिगृह जुने व मुलींचे वसतिगृह नविन या वसतिगृहामध्ये कंत्राटीतत्वावर खानावळ चालविणेकरिता वर्ष २०२६ ते २०२७ या अकरा महिने दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा फॉर्म, माहिती, शर्ती, अटी व नियम हे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत भांडार, विद्युत अभियांत्रिकी विभागामध्ये दिनांक **२१/०८/२०२६** ते **०३/०९/२०२६** पर्यंत रोख रूपये १०००/— (एक हजार) भरून सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (फक्त कार्यालयीन दिवशी) मिळतील. तसेच निविदेतील अटी व नियम हे या संस्थेचे संकेतस्थळ http://www.geca.ac.in यावर उपलब्ध आहेत. सदरील मोहरबंद निविदा दिनांक **०८/०९/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ या पत्यावर पोहचतील अशा रितीने पाठविण्यात याव्यात.** उशिरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक **१५/०९/२०२६** रोजी दुपारी ११.३० वाजता या संस्थेच्या विदयुत अभियांत्रिकी विभाग सेमिनार हॉल येथे उघडण्यात येतील. इच्छुक निविदाधारकांनी उपस्थित राहावे.

(डॉ.संजय शामराव डंभारे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रत :— १. मुख्य सुचना फलक
२. वसतिगृह सुचना फलक
३ संगणक विभागास वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

# मेस निविदा

## मेस चालविण्यासंदर्भात आवश्यक विवरण

**१) माहिती :–** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय , छत्रपती संभाजीनगर येथील
मातोश्री मुलींचे वसतिगृह जुने व नवे एकुण मुलींची संख्या –३००
वेळ– अल्पोपहार सकाळ ०७ ते ०९
जेवण सकाळी १२.०० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत
रात्री ८ ते ९.३० वाजेपर्यंत
मेस चालविण्यासाठी कंत्राटी पध्दतीने कंत्राटदार नियुक्त करावयाचे आहे.
कंत्राटदारास खालील खालील अटी व शर्ती अनिवार्य राहतील.

**२) मेसबाबत काही महत्वाच्या अटी व शर्ती :–**

१. कंत्राटदारास मेसच्या जागेचे दरमहा भाडे रू.५०००/– (पाच हजार रूपये मात्र) व विद्युत वापराचे प्रचलित दरानुसार महिन्याच्या दहा तारखेच्या आत संस्थेच्या रोखा विभागात भरावे लागेल.

२. सदर निविदा हे सुयोग्य दर, सकस आहार व सक्षम अनुभवी व्यक्तीची / संस्थेची मेस चालविण्यास निवड करण्यासाठी असून केवळ एकंदरीत कमी दराच्या आधारे निविदा मंजुर होईल असे नाही. एकुण सभ्यता, मालाची किंमत आणि पौष्टीकता, गुणवत्ता स्वच्छता इ. बाबत_तुलनात्मक तपासणी करुन सर्व निर्णय घेण्याचे समितीस अधिकार आहे.निविदांचे आधारे तसेच प्रत्यक्षात चौकशी करून व मुल्यमापन करून नियुक्त समितीच्या अंतिम पाहणीनुसार सक्षम मेस चालकास मेस चालविण्यास देण्याचा अंतिम निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार समितीस मा.प्राचार्य यांना प्राप्त आहेत.

३. निविदा उघडतांना प्रथम मोहोरबंद निविदा अ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात येईल. निविदा अ (तांत्रिक लिफाफा) यामध्ये आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्याची सत्यता व अनुभव पडताळल्यानंतर संस्थेच्या नियमांनुसार मेस चालविण्यास सक्षम असलेल्या निविदाधारकांचा लिफाफा ब (दरपत्रक लिफाफा) उघडण्यात येईल.

४. आपली निविदा मंजुर झाल्यास आपणास त्वरीत रूपये २०००००/– (रूपये दोन लक्ष मात्र) सुरक्षा ठेव मेस सुरू करणेपुर्वी भरावी लागेल. त्यावर कसलेही व्याज मिळणार नाही. मेस सुरक्षा अनामत रक्कम मेस कराराचा कालावधी संपल्यानंतर हिशोबाअंती शिल्लक रक्कम प्रमाणपत्र घेवून परत दिली जाईल.

५. स्वयंपाकासाठी लागणारे इतर साहित्य उदा. अन्नधान्य, गॅस (व्यावसायिक सिलेंडर), दुध, भाज्या इ. मेस स्वत कंत्राटदारास आणावे लागेल. सर्वांची देयके मेस चालकांनी स्वत: दयावीत त्याबाबतीत कोणतेही व्यक्ती संस्थेशी (मेस चालकाला पुरविणेच्या सामानासाठी) संपर्क करणार नाही याची काळजी घ्यावी.

६. संस्थेमधील आपल्याला दिलेल्या ताब्यातील पंखे, टयुबलाईट, फर्निचर, भांडी व इतर ाासकीय मालमत्ता गहाळ अथवा तूटफूट झाल्यास सदरील साहित्याची सद्यस्थितीत होणारी रक्कम मेस चालकाकडून वसुल करण्यात येईल किंवा आपण जमा केलेल्या सुरक्षाठेव रकमेतुन वसुल करण्यात . येईल.

७. मेस मधील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार मेस चालकांनी स्वत: द्यावा. काम करणारे कर्मचारी स्वच्छता बाळगणारे असावेत. त्या सर्वांचे वैद्यकीय प्रमाणपत्र फोटोसह सादर करावे लागेल. आवश्यक तेवढे कर्मचारी मेसमध्ये कामासाठी ठेवावे लागतील. मेसमध्ये बालकामगार नियुक्त करता येणार नाहीत. मेसमधील कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड असावा तसेच सदर कामगारांना संस्था परिसरात मेस चालकाकडून मिळालेले ओळखपत्र बाळगणे बंधनकारक राहील.

८. मेसच्या ठेका दुस–यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट ठकेदार ठेवता येणार नाही. तसे आढळल्यास महाविदयालयाच्या नियमानुसार कायदेशिर कारवाई करुन मेस सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

९. अगोदराच्या दिवशी तळण्यात आलेल्या पदार्थांचे तेल हे स्वयंपाक करतांना वापरण्यात येवु नये.

१०. विद्यार्थ्यांना / कर्मचारी यांना जेवण ठरवून दिलेल्या वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी. जेवणासाठी विनाकारण जास्त वेळ लागणार नाही याची ही दक्षता घेणे बंधनकारक राहील.

११. मेस मध्ये शिस्त पाळणे सर्वांना बंधनकारक राहील.

१२. सात्विक शुध्द भोजन देवून विद्यार्थ्यांसाठी प्रसन्न वातावरण तयार करावे.

१३. विद्यार्थ्यांना जेवणामध्ये उत्तेजक पदार्थ देण्यास मनाई आहे. तसेच विडी, सिगारेट, तंबाखु, गुटखा, मद्यपान इत्यादी मेसमध्ये ठेवता येणार नाही तसेच विद्यार्थ्यांना देता येणार नाही.

१४. मेस चालका कडील कामगांराना देखील कामावर असताना विडी,सिगारेट,तंबाखु,गुटखा,मद्यपान व उत्तेजक पदार्थांचे सेवन करता येणार नाही. तसे आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल.

१७. सदरील कराराचा कालावधी हा अकरा महिन्याचा असेल या कालवधीच्या आत आपणास मेस बंद करता येणार नाही. काही अपरिहार्य कारणासाठी मेस बंद करावयाचे असल्यास कमीत कमी एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना द्यावी लागेल अन्यथा या कालावधमध्ये आपणास मेस चालकास विदयार्थ्यांना भोजन पुरवठा करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपली सुरक्षाठेव रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी. **अकरा महिन्याचा अनुभव व खानावळीचा दर्जा याआधारे . सदर करार पुढील शैक्षणिक वर्षाकरिता नुतनीकरण करण्याचे संपुर्ण अधिकार संस्थेकडे सुरक्षित आहेत.**

१८. नैसर्गिक आपत्ती, साथीचे रोग, इतर आपत्ती इत्यादी कारणामुळे मेस बंद राहिल्यास कराराचा कालावधी वाढविणे संस्थेस बंधनकारक राहणार नाही. तथापि सदर कालावधी वाढविणे / योग्य असल्यास त्याबाबतचा निर्णय संस्था प्रमुखाचा राहिल. करारनाम्याचा कालावधी वाढविल्यास त्या कालावधीत मेस चालकास सेवा देणे बंधनकारक राहिल.

१९. मेस मधील जेवणाचा दर्जा उत्तम नसल्यास व तशी समिती प्रमुख हयांची खात्री झाल्यास मेस बंद करण्याचा अधिकार संस्थेस राहील याची नोंद घ्यावी.

२०. मेसची वेळ अल्पोपहार सकाळ ०७ ते ०९,जेवण सकाळी १२.०० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत व तसेच रात्री ०८.०० ते ०९.३० पर्यंत राहील.

२१. मेस चालकांनी स्वत:च संपूर्ण हिशोब ठेवायचा आहे. याची संपूर्ण जबाबदारी मेस चालकाची राहील.

२२. जेवणाची भांडी स्वच्छ असावी तसेच मेस मधील हॉल, किचन, हात धुण्याची जागा व परिसर स्वच्छ ठेवावा. भांडयाची व्यवस्था स्वतः कंत्राटदाराची राहील.

२३. मेस चालकांचे विद्यार्थ्यांशी काही दुमत असल्यास किंवा विद्यार्थ्यांना तक्रार असल्यास वादविवाद न करता, कुलमंत्री /हॉस्टेल वार्डन/वसतिगृह कर्मचारी यांच्याशी संपर्क करावा.

२४. मेस चालकाने सात्विक व पौष्टीक आहार देवुन घरगुती वातावरण निर्माण करावे, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे संबंध सलोख्याचे व आदराचे ठेवणेसाठी मेस चालकाने लक्ष घालावे. शांतता, मैत्रीपुर्ण, प्रसन्न वातावरण निर्माण करून पर्यायाने शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता संस्थेस मदत करावी.

२५. **समितीने मान्य केलेल्या निविदाधारकास मेस चालविण्याचे आदेश दिल्यानंतर ३० दिवसांचे आंत मेस सुरू न केल्यास सदर निविदाधारकाची निविदा रद्द करून अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या निविदाधारकास मेस चालविण्याकरिता देण्याचे अधिकार समितीस असुन त्याही निविदाधारकास ३० दिवसांचे आत मेस सुरू करणे बंधनकारक असेल त्यानंतर पहिल्या क्रमांकाचे निविदा धारकाची अनामत रक्कम किमान ६० दिवसानंतर परत केली जाईल.**

२६. संस्थेद्वारा मेससाठी उपलब्ध करून देण्यात आलेली जागा व फर्निचर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येवुन पाहणी करता येईल.

२७. मेस चालकामार्फत कार्यरत असलेल्या कामगारांचा कामावर असतांना काही अपघात झाल्यास, चोरी झाल्यास इतर दुर्घटना घटल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मेस चालकाची राहिल. कार्यरत कामगारांची विमा उतरविण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच अशा घटनेस संस्था जबाबदार राहणार नाही व त्याबाबतीत कुठल्याही आर्थिक व इतर भरपाईची मागणी मेस चालकास संस्थकडे करता येणार नाही. मेसमधील कामगार यांची दर तीन महिन्यांनी वैदयकीय अधिकाऱ्याकडून तपासणी बाबतचे प्रमाणपत्र वसतिगृह कार्यालयात सादर करावेत.ठेकेदारांनी त्यांचे सर्व कर्मचाऱ्यांचे तसेच ठेक्याबाबत संपूर्ण कामगार कायदे व स्थाई आदेश यांचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राईल.

२८. मेस मधील शिल्लक राहिलेले शिळे अन्न, जैविक कचरा व इतर टाकावू पदार्थ / वस्तु इत्यादीची योग्य ती विल्हेवाट संस्थेच्या परिसरा बाहेर लावण्याची जबाबदारी मेस चालकाची राहिल.

२९. मेस चालक व संस्था यांच्यात निविदेतील अटी शर्थीच्या अधिन राहून झालेल्या करारनाम्या बाबत कोणताही कायदेविषयक वाद उद्‌भवल्यास त्याकरिता भारतीय लवाद कायदा १९९६ तरतुदी लागू राहतिल. लवाद कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर राहिल व संस्था प्रमुख लवाद राहतिल.

३०. मेस चालकास दिलेले काम असमाधानकारक आहे, असे वारंवार आढळून आल्यास याबाबतील काही वाद निर्माण झाल्यास रितसर नोटीस देवून सर्व सुरक्षा रक्कम जप्त करतांना मुदतपूर्व कंत्राट रद्द करण्याचा अधिकार संस्था प्रमुखाचा राहिल.

३१. कामाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी मेस चालकाने काम सोडून दिल्यास,नंतर नव्याने निविदा मागवून घ्यावी लागल्यास आलेला दर चालू मंजूर दरापेक्षा जास्त आल्यास होणारी फरकाची रक्कम व संस्थेस झालेला खर्च असे एकंदरित काम अपूर्ण सोडणाऱ्या मेस चालकाकडून वसूल करण्यात येईल.

३२. मेस चालवित असतांना कंत्राटदारास बंधनकारक असलेल्या बाबींचे उल्लंघन झाल्यास खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

| अ.क्र | बाबींचा तपशिल | आकारण्यात येणाऱ्या दंडाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रार / सुचना नोंदवही न ठेवणे | रु.५००/ प्रति दिवस |
| २ | पदार्थात कुठलाही किटक आढळणे | रु.५००/ प्रति घटना |
| ३ | पदार्थात प्लास्टिक / केस / दोरी / कपडा आढळल्यास | रु.५००/ प्रति घटना |
| ४ | पदार्थात दगड / खडे आढळणे | रु.५००/ प्रति घटना |
| ५ | अस्वच्छ भांडी / उपहारगृह परिसर | रु.५००/ प्रति दिवस |
| ६ | कच्चे न शिजलेले / बेचव अन्न आढळणे | रु.५००/ प्रति दिवस |
| ७ | कामगारांची अस्वच्छता व असभ्य वर्तन | रु.५००/ प्रति कामगार |

मेस मध्ये जेवण करीत असतांना जर मुलांच्या व मुलींच्या ताटामध्ये काही अनपेक्षीतपणे किडे,अळी,झूरळ इ.निघाले तर त्यांनी त्वरीत वसतिगृह अधिक्षक / वसतिगृह अधिक्षीका किंवा त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी यांना दाखवावे चौकशी केल्यांनंतर त्यांनी त्वरीत रेक्टर यांना अहवाल सादर करावा.नंतर रेक्टर हे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे ,अन्न व औषध विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन त्यामुळे विदयार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परीणाम झाल्यास, त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.ठेकेदाराने पुरविलेले खादयपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास व सिध्द झाल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायदयातील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील व मेस ठेका रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्याम येईल.व त्या मेस ठेकेदाराला शासकीय अभियांत्रिकी महाविदयालयाच्या काळया यादीत टाकले जावून त्याला पुढील निविदा भरण्याचा हक्क राहणार नाही.

३३. उपरोक्त अटी व शर्ती संबंधी काही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी महाविदयालय प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील. तसेच उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल / सुधारणा करण्याचा पुर्ण हक्क महाविदयालय प्रशासनाने राखुन ठेवला आहे.

३४. मेसमध्ये खालील प्रमाणे दर्जा (ब्रॅड ) असणारे विविध प्रकारचे धान्य/ पदार्थ वापरण्यात यावे.

| अ.क्र | पदार्थाचा तपशिल | पदार्थाचा दर्जा (ब्रॅड ) |
|---|---|---|
| १ | गहु | १४७,सरबती,नर्मदा |
| २ | तांदुळ | कोलम,एचएमटी,इंद्रायनी |
| ३ | खादयतेल (रिफाइन्ड) | किर्ती गोल्ड,फॉर्च्युन,रीच सोया,जेमीनी |
| ४ | सर्व प्रकारच्या दाळी | चांगल्या प्रतीच्या |
| ५ | मसाले | एमडीएच,एव्हरेस्ट,सुहाना किंवा त्या प्रतीचे |

३५. यापूर्वी ज्या मेस ठेकेदारांना चालू आर्थिक वर्षात याच संस्थेत इतर ठिकाणी (मुलांची /मुलींची) वसतिगृह चालीवण्यास मिळाली आहे अशा ठेकेदारांनी निविदा भरु नये.अन्यथा त्यांची निविदा अपात्र करण्यात येईल.

३६. महाविदयालयातील कर्मचारी /अधिकारी यापैकी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीस मेसचा ठेका घेता येणार नाही.

३७. एका निविदाधारकास एक मेस ठेका देण्यात येईल व तसेच कोणत्या मेसचा ठेका कोणत्या निविदाधरकास दयावा याचे सर्व अधिकार महाविदयालयाकडे राहतील .

३८. विदयार्थ्याशिवाय इतर कोणालाही मेस मध्ये जेवण देण्यास बंदी राहील.परंतु विदयार्थ्यांचे पालक /पाहुणे /संस्थेतील कर्मचारी यांना गेस्ट चार्ज आकारुन मेस मध्ये जेवण देता येईल तसेच संस्थेतील कार्यक्रम किंवा सभेला जेवण लागल्यास मा.कुलमंत्री यांच्या पूर्वपरवानगीने देता येईल.या व्यतिरीक्त कोणत्याही कार्यक्रमाला वा व्यक्तीला मेस मधील जेवण देण्यास प्रतिबंध राहील.

३९. मेस मध्ये एकावेळेस उपयोगात येणा–या प्लॅस्टीकचा (Single Use) वापर करु नये.तसेच प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.तसे न केल्यास दंडात्मक कार्यवाही करयात येईल.

४०. महाविदयालयाने मेस व्यवस्थापणाचे ऐनवेळेस घेतलेले निर्णय मेस चालकास बंधनकारक राहील.

४१ मेस संदर्भातील पुरुष कर्मचा–यांना महिला सुरक्षा कर्मचारी व महिला वसतिगृह अधिकारी यांचेसोबतच वसतिगृहात प्रवेश करता येईल. तसेच पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

४२ विदयार्थीनींच्या मागणीनुसार तसेच संस्थेच्या परवानगीनंतर मेस चालकाला अतिरीक्त शुल्क घेवून स्पेशल डिशेस तसेच बंद पाकीटातील मान्यता प्राप्त अन्न पदार्थ तसेच इतर तत्सम पदार्थ विकता येईल.

४३. मेस मेनु खालील प्रमाणे राहील.